| | |
|---|---|
| **Guide on Deposit Insurance System in India** | भारतामधील ठेव-विमा प्रणालीवरील मार्गदर्शकमार्गदर्शिका |
| Maximum Insured Rs. 1,00,000 Per Depositor | प्रति ठेवीदार कमाल रु.1,00,000 साठी विमा संरक्षण |

page1 –part1

| | |
|---|---|
| **Deposits held in joint accounts (revised w.e.f. April 26, 2007)**<br><br>If more than one deposit account (Savings, Current, Recurring or Fixed deposit) are jointly held by individuals in one or more branches of a bank say three individuals A, B & C hold more than one joint deposit account in which their names appear in the same order then all these accounts are considered as held in the same capacity and in the same right. Accordingly, balances held in all these accounts will be aggregated for the purpose of determining the insured amount within the limit of Rs. 1 lakh.<br><br>However, if individuals open more than one joint account in which their names are not in the same order for example. A, B and C; C, B and A; C, A and B; A, C and B; or group of persons are different say A, B and C and A, B and D etc. then, the deposits held in these joint accounts are considered as held in the different capacity and different right. Accordingly, insurance cover will be available separately upto rupees one lakh to every such joint account where the names appear in different order or names are different. | **संयुक्त खात्यांमध्ये ठेवलेल्या ठेवी (एप्रिल 26, 2007 पासून)**<br>एखाद्या बँकेच्या एका किंवा अधिक शाखांमध्ये एखाद्या व्यक्तीने एकापेक्षा अधिक ठेव खाती (बचत , चालु, आवर्ती किंवा स्थिर ठेव) संयुक्तपणे ठेवलेली असल्यास , (म्हणजे समजा, अ, ब व क ह्या तीन व्यक्तींची , त्यांची नावे त्याच क्रमाने असलेली , एकापेक्षा अधिक संयुक्त खाती ठेवलेली असल्यास) ही सर्व खाती त्याच क्षमतेत व त्याच हक्काने ठेवली असल्याचे समजले जाईल. त्यानुसार ह्या सर्व खात्यात असलेल्या शिल्लक रकमा ह्या , रु.1 लाखाच्या मर्यादेमध्ये विमा-रक्कम ठरविण्यासाठी एकत्रित केल्या जातील.<br>तथापि, अशा/काही व्यक्तींनी , त्यांची नावे त्याच क्रमात नसलेली एकापेक्षा अधिक संयुक्त खाती उघडल्यास (उदा. अ, ब व क; क, ब व अ; क, ब व अ; आणि अ, क व ब) किंवा व्यक्तींचा गट वेगळा असल्यास (म्हणजे अ , ब व क; आणि अ, ब व ड इत्यादि) ह्या संयुक्त खात्यात ठेवलेल्या ठेवी , निराळ्या क्षमतेत व निराळ्या हक्कांनी ठेवल्याचे समजण्यात येईल. त्यानुसार , जेथे नावे निराळ्या क्रमाने आहेत किंवा नावे निराळी आहेत अशा प्रत्येक संयुक्त खात्याला(स्वतंत्रपणे), रुपये एक लाख पर्यंतचे विमा संरक्षण वेगळ्याने उपलब्ध असेल. |
| **If a bank goes into liquidation.**<br><br>The Corporation pays to each depositor, directly or through the liquidator, amount of his deposit upto Rs.1lakh. | **बँकेचे दिवाळे निघाल्यास**<br>हा निगम प्रत्येक ठेवीदाराला , थेट किंवा लिक्विडेटरच्या मार्फत, रु.1 लाख पर्यंत त्याच्या ठेवीची रक्कम प्रदान करतो. |

| | |
|---|---|
| **If a bank is reconstructed or amalgamated with another bank.**<br><br>The Corporation pays if the scheme of reconstruction / amalgamation provides for payments to depositors by the DICGC. Such payment by DICGC to the depositor is limited to maximum amount of Rs. 1 lakh. The admissible amount of claim for each depositor is determined after taking into account the amount already credited to the depositor's account as per the scheme. If amount already credited is Rs. 1 lakh or more, no amount is payable to such a depositorbyDICGC. | **एखाद्या बँकेची पुनर्रचना झाल्यास किंवा ती दुस-या एखाद्या बँकेत विलीन झाल्यास**<br>पुनर्रचनेच्या किंवा विलीनीकरणाच्या योजनेत , डीआयसीजीसीकडून ठेवीदाराला प्रदान केले जाणे समाविष्ट असल्यास हा निगम ती प्रदाने करतो. ठेवीदाराला डीआयसीजीसीकडून करण्यात येणारे असे प्रदान कमाल रु. 1 लाखापर्यंतच सीमित आहे. प्रत्येक ठेवीदारासाठी असलेल्या दाव्याबाबतची परवानगीप्राप्त रक्कम ही , ह्या योजनेनुसार , त्या ठेवीदाराच्या खात्यात आधीच जमा केलेली रक्कम हिशेबात घेऊन ठरविली जाते. अशी जमा केली गेलेली रक्कम रु. 1 लाख किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास , अशा ठेवीदाराला डीआयसीजीसीकडून कोणतीही रक्कम देय नसते. |

| | |
|---|---|
| **Do depositors pay for insurance cover?**<br><br>Depositors don't have to pay anything for the insurance cover provided in respect of deposits kept in banks. The cost is borne entirely by the insured banks which pay to the Corporation a premium at ten paise per annum per Rs.100 of deposits. | **विमा संरक्षणासाठी ठेवीदार पैसे/आकार देतात काय ?**<br>बँकांमध्ये ठेवलेल्या ठेवींबाबत देण्यात येणा-या विमा संरक्षणासाठी ठेवीदारांना कोणतीही रक्कम/आकार द्यावा लागत नाही. हा खर्च विमा संरक्षित बँकांकडूनच केला जातो , व त्या बँका ह्या निगमाला प्रति रु.500100रुपयांच्या ठेवींवर प्रतिवर्ष 10 पैसे हप्ता देतात. |
| **How much amount of deposits (per cent) is covered by insurance ?**<br><br>The Deposit Insurance Scheme has considerably strengthened public confidence in the banking system. As at the end of March 2015 around 1456 million deposit accounts (over 92%) in insured banks are fully protected, and around Rs. 26068 billion (nearly 31% of total deposits) enjoy insurance cover. | **विमा संरक्षण दिलेल्या ठेवींची एकूण रक्कम किती ?**<br>ह्या ठेव-विमा योजनेमुळे जनतेचा बँकिंग प्रणालीवरील विश्वास वाढला आहे. मार्च 2015 च्या अखेरीस , विमा संरक्षित बँकांमधील सुमारे 1456 दशलक्ष ठेवी खाती ( 92% पेक्षा अधिक) संपूर्णपणे विमा संरक्षित असून , रु.26068 बिलियन रकमेला (एकूण ठेवींच्या सुमारे 31%) विमा संरक्षण लाभले आहे. |
| **Notice:**<br><br>The information is of non- technical nature and is not intended to be a legal interpretation of the deposit insurance scheme. | सूचना : ही माहिती अ-तांत्रिक स्वरुपाची असून , ती ठेव-विमा योजनेचे कायदेशीर स्वरुप नाही. |
| DEPOSIT INSURANCE AND CREDIT GUARANTEE CORPORATION<br><br>Deposit Insurance and Credit Guarantee Corporation, RBI (2nd Floor), Opp. to Mumbai Central Rly. Station, Mumbai - 400008<br>DICGC Tel. No. (022) 2308-4121;<br>website: https://www.dicgc.org.in | **ठेव विमा व ऋण हमी निगम(DICGC)**<br>(भारतीय रिझर्व बँकेच्या संपूर्ण मालकीची सहायक कंपनी)<br>ठेव विमा व ऋण हमी निगम,(DICGC),आरबीआय(2रा मजला), मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशन समोर, मुंबई - 400008<br>डीआयसीजीसी टेलिफोन क्रमांक : (022) 2308-4121;<br>वेबसाईट :https://www.dicgc.org.in |

page2 –part1

| | |
|---|---|
| **Which banks are insured by the DICGC?**<br>1. All commercial banks including branches of foreign banks functioning in India, local area banks and regional rural banks are insured by the DICGC.<br>2. All eligible co-operative banks other than thosefrom the State of Meghalaya and the Union Territories of Chandigarh, Lakshadweep and Dadra and Nagar Haveli are covered under the deposit insurance system of DICGC.<br>3. Primary cooperative societies, Non-banking Financial Companies (NBFCs), Mutual Funds etc.arenotinsuredbytheDICGC. | **कोणत्या बँकांना डीआयसीजीसी विमा संरक्षण देते ?**<br>(1) भारतामध्ये कार्यरत असलेल्या विदेशी बँका , स्थानिक क्षेत्रीय बँका व प्रादेशिक ग्रामीण बँका हयांच्या शाखांसह सर्व वाणिज्य बँका , डीआयसीजीसीकडून विमा संरक्षित केल्या जातात.<br>(2) मेघालय राज्य व चंदीगढ , लक्षद्वीप आणि दादरा व नगरहवेली मधील बँका सोडल्यास , पात्र असलेल्या सर्व सहकारी बँका डीआयसीजीसीच्या ठेव योजनेखाली समाविष्ट आहेत.<br>(3) प्राथमिक सहकारी सोसायट्या , अबँकीय वित्तीय कंपन्या (एनबीएफसी), म्युच्युअल फंड इत्यादी, डीयासीजीसीकडून विमा संरक्षित केल्या जात नाहीत. |
| **What does the DICGC insure?**<br>In the event of a bank failure, DICGC protects bank deposits that are payable in India. The DICGC insures all deposits such as savings, fixed, current, recurring, etc. except the following types of deposits<br>(I) Deposits of foreign Governments;<br>(ii) Deposits of Central/State Governments;<br>(iii) Inter-bank deposits;<br>(iv) Deposits of the State Land Development Banks with the State co-operative bank;<br>(v) Any amount due on account of any deposit received outside India<br>(vi) Any amount, which has been specifically exempted by the Corporation with the previous approval of Reserve Bank of India. | **डीआयसीजीसी कशाचा विमा उतरविते ?**<br>एखादी बँक अपयशी ठरल्यास, डीआयसीजीसी, भारतामध्ये देय असलेल्या ठेवींचे संरक्षण करते. डीआयसीजीसी , पुढील प्रकारच्या ठेवी सोडून , बचत, स्थिर, चालु, आवर्ती इत्यादींसारख्या सर्व ठेवींचा विमा उतरविते.<br>(1) विदेशी सरकारांच्या ठेवी.<br>(2) केंद्र/राज्य सरकारांच्या ठेवी.<br>(3) आंतर बँकीय ठेवी.<br>(4) राज्य सहकारी बँकांकडे, भूविकास बँकांनी ठेवलेल्या ठेवी.<br>(5) भारताबाहेर मिळालेल्या कोणत्याही ठेवीबाबत देय असलेली कोणतीही रक्कम.<br>(6) भारतीय रिझर्व बँकेची पूर्व मंजुरी घेऊन, हया निगमाकडून विशेष सूट देण्यात आलेली कोणतीही रक्कम. |
| **What is the maximum deposit amount insured by the DICGC?**<br>Each depositor in a bank is insured upto a maximum of Rs. 1,00,000 (Rupees One Lakh) for both principal and interest amount held by him in the same capacity and same right as on the date of liquidation/cancellation of bank's licence or the date on which the scheme of amalgamation/ merger/reconstruction comes into force. | **डीआयसीजीसीकडून विमा संरक्षण देण्याबाबतची कमाल ठेव रक्कम कोणती ?**<br>बँकेमधील प्रत्येक ठेवीदाराचा , बँकेचे दिवाळे निघाल्याच्या/बँकेचा परवाना रद्द होण्याच्या तारखेस किंवा , त्या बँकेचे विलीनीकरण/एकत्रीकरण/पुनर्रचना हयांची योजना जारी होण्याच्या तारखेस , त्याच्या त्याच क्षमतेत व हक्काने ठेवलेल्या, कमाल रु. 1,00,000 (रुपये एक लाख) पर्यंतच्या रकमेचा (मुद्दल व व्याज हया दोन्हींही साठी) विमा |

| | |
|---|---|
| | उतरविला जातो. |
| | |

page2-part2

| | |
|---|---|
| **How will I know whether my bank is insured by the DICGC or not?**<br>The DICGC while registering the banks as insured banks furnishes them with printed leaflets for display giving information relating to the protection afforded by the Corporation to the depositors of the insured banks. In case of doubt, depositor should make specific enquiry from the branch official in this regard. | **डीआयसीजीसीकडून माझ्या बँकेचा विमा उतरविला आहे की नाही हे मला कसे कळेल ?**<br>विमा उतरविलेल्या बँका म्हणून पंजीकरण करतेवेळी , डीआयसीजीसी, त्या बँकांना , विमा संरक्षित बँकांच्या ठेवीदारांसाठी ह्या निगमाकडून देण्यात येणा-या संरक्षणाची माहिती असलेल्या छापील हस्तपत्रिका देते. शंका आल्यास , ठेवीदाराने ह्याबाबत शाखा अधिका-याकडे विशेष चौकशी करावी. |
| **Are deposits in different banks separately insured?**<br>Yes. If you have deposits with more than one bank, deposit insurance coverage limit is applied separately to the deposits in each bank. | **निरनिराळ्या बँकांमधील ठेवीवेगवेगळ्यानेविमा संरक्षित केल्या जातात काय ?ठेवींचे विमा संरक्षण वेगवेगळेहोते काय ?**<br>होय. तुम्ही एकापेक्षा अधिक बँकांमध्ये ठेवी ठेवल्या असल्यास, प्रत्येक बँकेमधील ठेवींना विमा छत्राची मर्यादा वेगळ्याने(स्वतंत्रपणे)लागु केली जाते. |
| **Does the DICGC directly deal with the depositors of failed banks?**<br>No. In the event of a bank's liquidation, the liquidator prepares depositor wise claim list and sends it to the DICGC. After scrutiny the DICGC pays the money to the liquidator who is liable to pay to the depositors. In the case of amalgamation / merger of banks, the amount due to each depositor is paid to the transferee bank. | **अपयशी बँकांच्या ठेवीदारांशी डीआयसीजीसी थेट व्यवहार करते काय ?**<br>नाही. एखाद्या बँकेचे दिवाळे निघाल्यास , त्या बँकेसाठी नेमलेला लिक्विडेटर , ठेवीदार निहाय (ठेविदारानुसार)असलेली दाव्यांची यादी तयार करुन , ती डीआयसीजीसीकडे पाठविते. छाननी केल्यानंतर, डीआयसीजीसी लिक्विडेटरकडे पैसे पाठविते आणि ते पैसे , लिक्विडेटरने ठेवीदारांना द्यावयाचे असतात. बँकांचे विलीनीकरण/एकत्रीकरण झाल्यास , प्रत्येक ठेवीदाराला देय असलेली रक्कम हस्तांतरण केलेल्या बँकेला दिली जाते. |
| **Can any insured bank withdraw from the DICGC coverage?**<br>No. The deposit insurance scheme is compulsory and no bank can withdraw from it. | **विमा संरक्षित असलेली एखादी बँक डीआयसीजीसीमधून बाहेर पडू शकते काय ?**<br>नाही. ठेव-विमा योजना सक्तीची असून कोणतीही बँक त्यातून माघार घेऊ शकत नाही. |

| | |
|---|---|
| **Can the DICGC withdraw deposit insurance coverage from any bank?**<br>The Corporation may cancel,the registration of an insured bank if it fails to pay the premium for three consecutive half year periods or its license is | **डीआयसीजीसी, एखाद्या बँकेमधून ठेव विमा योजना परत घेऊ शकते काय ?**<br>एखाद्या विमा संरक्षित बँकेने, सहा-सहा महिन्यांचा हप्ता सतत तीन वेळा दिला नसल्यास किंवा तिचा परवाना रद्द करण्यात आला असल्यास, हा निगम त्या बँकेचे पंजीकरण रद्द करु शकतो. सहामाही हप्ता भरण्यात कसुरी केल्यामुळे एखाद्या बँकेचे हे विमा छत्र काढून घेतले गेल्यास , जनतेला त्याबाबत वृत्तपत्रामार्फत अधिसूचित केले जाईल. |
| | |

page2-part3

| | |
|---|---|
| **What is the meaning of deposit held in the same capacity and same right, and deposits, held in different capacity and different right?**<br><br>If an individual opens more than one deposit account in one or more branches of a bank e.g., Shri S. K. Pandit opens one or more savings/current account and one or more fixed/recurring deposit accounts etc., all these are considered as accounts held in the same capacity and in the same right. Therefore, the balances in all these accounts are aggregated and maximum insurance cover is available upto rupees one lakh. | **त्याच क्षमतेत व त्याच हक्काने ठेवलेली ठेव , आणि निराळ्या क्षमतेत व निराळ्या हक्कात ठेवलेल्या ठेवी ह्याचा अर्थ काय ?**<br>एखाद्या व्यक्तीने , एखाद्या बँकेच्या एकापेक्षा अधिक शाखांमध्ये, एकापेक्षा अधिक ठेव खाती ठेवली असल्यास , (उदा. - श्री एस के पंडित ह्यांनी एक किंवा एकापेक्षा अधिक बचत/चालु खाती; किंवा एक अथवा एकापेक्षा अधिक स्थिर/आवर्ती ठेव खाती ठेवली असल्यास) ही सर्व खाती , एकाच क्षमतेत व त्याच हक्काने ठेवलेली खाती समजली जातात. त्यामुळे , ह्या सर्व खात्यांमधील शिल्लक रकमा एकत्रित केल्या जातात व त्यासाठी कमाल रु. एक लाखापर्यंतचे विमा छत्र उपलब्ध असते.<br>श्री एस के पंडित ह्यांनी, एखाद्या कंपनीचा भागीदार, किंवा एखाद्या अल्पवयीन व्यक्तीचा पालक , किंवा एखाद्या कंपनीचा संचालक , किंवा एखाद्या ट्रस्टचा ट्रस्टी म्हणून किंवा त्यांची पत्नी श्रीमती के ए पंडित ह्यांच्या बरोबरचे संयुक्त खाते , त्या बँकेच्या एका किंवा एकापेक्षा अधिक शाखात उघडले असल्यास, अशी खाती, निराळ्या क्षमतेत व निराळ्या हक्काची समजली जातात. त्यामुळे अशा ठेव खात्यांना वेगळ्याने(स्वतंत्रपणे) रु. एक लाखापर्यंतचे विमा संरक्षण उपलब्ध असते.<br>ह्याशिवाय येथे स्पष्ट करण्यात येत आहे की , येथे(जिथे) ठेवीदार हा एकमेव मालक आहे ,अशा मालकी संस्थेच्या नावे ठेवलेली ठेव, आणि त्याच्या वैय्यक्तिक क्षमतेत ठेवलेली ठेव |

| | |
|---|---|
| | एकत्रित केली जाते व त्यासाठी , कमाल रुपये एक लाखापर्यंतचे विमा संरक्षण उपलब्ध असते. |
| | |